**<u>प्रतिवादी तर्फे साक्षदार क्र. १ विमल अरुण गिरडकर</u>**

**<u>साक्षीदाराचा उलट तपास वादी तर्फे विद्वान वकील श्री भिसीकर यांचे मार्फत शपथेवर सुरु -</u>**

इसाराचे पैसे परत केल्याबाबत प्रतिवादी अरुण यांनी पावती लिहुन घेतली होती. अशी कोणतीही पावती मी पाहीलेली नाही. इसाराची रक्कम परत मिळाली असं लिहीलेली कोणतीही पावती रेकॉर्डवर दाखल नाही, याबाबत मी काही सांगु शकत नाही. हे खोटे आहे की दि. ३१.०५.२०१३ चा करारनामा कधीच रद्द झालेला नाही. हे खोटे आहे की इसाराची रक्कम सोसायटीला परत केलेली नाही. २९.११.२०१३ व ०४.१२.२०१३ रोजी सोसायटीचे अधिकारी विक्रीपत्र करुन घेण्यासाठी दुयम निबंधक कार्यालयात हजर होते, याबाबत मला काहीही माहीत नाही. हे मला माहीत नाही की ब्लॉक नं. ३ व ४ दावा मिळकतीच्या दक्षिण बाजूला आहे. दावा मिळकत ज्या इमारतीत आहे त्याच इमारतीत मी वरील मजल्यावर राहते. प्रतिवादी अरुण यांनी ब्लॉक क्र. ३ व ४ चे बांधीव क्षेत्रफळ वाढवण्यासाठी नगर परिषदेकडे अर्ज केला होता, याबाबत मला काही माहीती नाही. हे मला माहीत नाही की दावा मिळकतीच्या क्षेत्रफळ विस्तारीकरण / वाढीव मिळावे याबाबत अरुण यांनी नगर परिषदेकडे अर्ज केला होता किंवा कसे.  मी प्रतिवादी अरुण यांच्या सहया ओळखते. तसेच मी त्यांचे हस्ताक्षर ही ओळखू शकते.

यावेळी साक्षदारास एक दस्त दाखवण्यात आला. त्यातील सर्व मजकुर विधीज्ञ श्री भिसीकर यांनी साक्षदारास वाचून दाखवला. त्यावर श्री अरुण यांची सही आहे व ती तुम्ही ओळखता का असा त्यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांचे उत्तर असे आहे की अरुण यांची सही तश्या स्वरुपाची होती परंतु ही सही अरुण यांची आहे काय हे त्या सांगु शकत नाही.

अरुण यांनी सोसायटीचे कर्ज फेडले व त्यामुळे सोसायटीचा बोजा कमी

करण्यात यावा अश्या स्वरुपाचा अर्ज अरुण यांनी नगर परिषदेकडे दिला होता की कसे, याबाबत मला काही सांगता येणार नाही. हे खोटे आहे की अरुण यांनी रु. ८,२७,१००/- रुपये भरले याचा दाव्यातील करारनाम्याच्या रद्द होण्याच्या संदर्भात कुठलाही संबंध नाही. हे खोटे आहे की वाद मिळकत विक्री करण्यासंदर्भात मी इतरांसोबत चर्चा करत आहे. करारनाम्यात जेवढे क्षेत्रफळ नमुद आहे त्यापेक्षा कमी क्षेत्रफळास मंजुरी मिळत असेल तर त्याच्या त्या प्रमाणात विक्री रक्कम घेवून खरेदी करुन देण्यास मी तयार नाही. वाद मिळकतीचे खरेदी खत मी वादीच्या हक्कात करुन देण्यास मी तयार नाही. हे खोटे आहे की खरेदी करुन देण्यास आमच्या कडुन विलंब होत आहे आणि त्यामुळे आम्ही वादीस नुकसान भरपाई देण्यास पात्र आहोत.

वाद मिळकत विक्री करण्यासाठी पुर्व परवानगी घ्यावी लागते अश्या तरतुदीबाबत मला माहीती नाही. वाद मिळकतीच्या इमारतीत आजही १००० स्के. फुटाचा ब्लॉक रिकामा आहे. सप्टेंबर २०१३ मध्ये वाद मिळकतीच्या बांधकामाचा नकाशा पुनर मंजुरी करुन घेण्यात आला व बांधकामाचे क्षेत्रफळ वाढवले याबाबत मला माहीती नाही. सदर व्यवहाराची पुर्ण माहिती अरुण यांना होती व मला त्याची माहीती नव्हती. साक्षदार स्वतःहुन सांगतात की सौदा रद्द झाला हे मला माहीती आहे. वादी हे खरेदी खत करुन दयावे यासाठी अरुण यांच्या मागे लागले होते, याबाबत मला माहीती नाही. डिसेंबर २०१३ पर्यंत करारनामा रद्द करण्यात आला नाही, याबाबत अरुण यांनी काही उजर घेतला होता काय, याविषयी मला माहीती नाही. त्याचे कारण असे की मला व्यवहाराबाबत काही माहीती नव्हते. अरुण यांनी विधीज्ञ श्री पिंपळकर यांचे मार्फत काय नोटीसा पाठवल्या याबाबत मला माहीती नाही. हे खोटे आहे की वादी हे दावा मिळकतीचे खरेदीखत करुन देण्यासाठी नेहमीच पुर्वीही इच्छुक होते व आजही इच्छुक आणि तयार आहे.

वरील उत्तर लिहीत असतांना साक्षदाराने नमुद केले की जागा महाग होती व ते स्वस्तात मागत होते आणि अरुण यांना ही जागा त्यांना कधीही दयायची नव्हती. साक्षदार परत सांगतात की वादी १००० स्के. फीट जागा मागत होते व अरुण हे ५०० स्के. फीट देण्यास तयार होते. हे खोटे आहे की मला या प्रकरणाविषयी काही माहीती नाही व मी खोटी साक्ष देत आहे. हे खरे आहे की अरुणोदय इमारत क्र. २ मध्ये माझा स्वतःचा फ्ॅलॅट आहे. आमचा अरुणोदय इमारत क्र. १ मध्ये देखील फ्ॅलॅट आहे. त्या फ्ॅलॅट च्या कर्जाच्या वसुली साठी वादी सोसायटीने  प्रक्रीया  सुरु केली आहे, याबाबत मला माहीती नाही. हे मला माहीत नाही की प्लॉट क्र. १०५ यावरील बोजा कमी करण्यासाठी अरुण यांनी दि. २२.०५.२०१९ रोजी अर्ज दिला होता की कसे. हे मला माहीत नाही की सदर प्लॉट वरील बोजा उतरवण्यात आलेला आहे. आता मला एक दस्त म्हणजे दि. २२.०५.२०१९ चा अर्ज दाखवण्यात आला. त्यावर अरुण यांची सही आहे काय व तो दस्त अरुण यांच्या हस्ताक्षरात आहे काय हे मला माहीत नाही. हे खोटे आहे की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास काही नाही.**

समक्ष,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड
दि. ३०.११.२०२४

श्रवणोत्तर स्विकृती,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड